**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय**
"वनभवन" , रामगिरी रोड, पोलीस जिमखान्याजवळ, सिव्हील लाईन, नागपूर-440 001
दुरध्वनी क्रमांक-0712 2556937,2555673 फॅक्स क्रमांक 0712-2550675, E-mail : apccfprotection@mahaforest.gov.in

क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५ / ४२४ / १८-१९
नागपूर-४४० ००१, दिनांक १५/०१/२०१९

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई, व कांदळवन मुंबई
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व

**विषय:-** आगीपासुन वनाचे संरक्षण करण्याबाबत.

**संदर्भ:-**१.स्थाई आदेश पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.२०४/२०००-०१/२१०, दिनांक २२ मे,२००१
२.शासन पत्र क्रमांक संकीर्ण-०३/२०१८प्र.क्र.७८/फ-६, दि.२७/११/२०१८
३.या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/३६७/२०१८-१९, दि. ११/१२/२०१८.
४.या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/३९९, दि. २९/१२/२०१८.
५.वरीष्ठ वनअधिकारी यांची सभा नागपूर येथे दिनांक ४ व ५ जानेवारी २०१९ मधील दिलेले निर्देश
६.या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/४१०/१८-१९, दि. ८/०१/२०१९

वनाचे अवनती करीता माहे १५ फेंब्रुवारी ते १५ जुन पर्यंत लागणारे वनवणवे मुख्यत्वे कारणीभुत आहेत. या वनवणव्यामुळे जमिनीच्या पृष्ठ भागावरील असणारे लहानझुडपे, गवत ,पुनर्निर्मीती व वन्यजीव जळुन नष्ट होतात. त्याचा परिणाम पर्यावरणावर होत असतो. त्यामुळे वनवणवा नियंत्रण व सनियंत्रण शास्त्रशुध्द पध्दतीने दिलेल्या कालावधीत पार पाडणे आवश्यक आहे.

वनवणवा नियंत्रण व नियोजन करावयाच्या कामाची चेक लिस्ट सोबत दिलेल्या प्रपत्रानुसार विहीत कालावधीत करण्याबाबत सोबतच्या प्रपत्रात माहीती वनपरिक्षेत्रवार सादर करावयाची आहे. प्रपत्रातील विषयानुसार वनपरिक्षेत्रवार संख्या, परिमाण, क्षेत्र हे., कि.मी. मध्ये किती उद्दीष्ट पार पाडावयाचे होते, त्या पैकी किती प्रमाणात कामे पार पाडली याची माहीती सविस्तर सादर करण्यात यावी.

आग प्रतिबंधक उपाययोजना करतांना संयुक्त व्यवस्थापन समिती सदस्य व स्थानिक लोकांचा सहभाग वाढवावा. लोक सहभागाशिवाय प्रभावी संरक्षण शक्य होत नाही. त्यासाठी त्यांचेशी नियमित संपर्क, सभा, चर्चा होणे आवश्यक आहे. वनक्षेत्रातील आग प्रवण क्षेत्र निश्चित करुन या क्षेत्राकरीता आग प्रतिबंधक उपकरणे योग्य ठिकाणी उपलब्ध आहेत याची खात्री करावी, ना दुरुस्त उपकरणे दुरुस्त करुन अदयावत ठेवणे

व त्याचा योग्य वापर करण्यात यावा. वनवृत्तामध्ये उपलब्ध सर्व साधनसामुग्री, मनुष्यबळ यांचे सुनियोजन करुन तसेच ईतर संबंधित विभागाशी समन्वय साधुन आगीवर नियंत्रण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावा.फॉरेस्ट सर्व्हे ऑफ ईन्डीया मार्फत प्राप्त होणा-या आगीच्या घटना (Fire Alert) १ जानेवारी २०१९ पासुनचा वास्तविक जळीत क्षेत्राची तपासणी अहवाल सादर करण्यात यावा.

चेक लिस्टनुसार सर्व कामे दिलेल्या मुदतीत पुर्ण करुन घेण्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी प्रत्येक महिण्यात आढावा बैठक घेवून संनियंत्रण करावे. तसेच वनविभागातील वनाधिकारी यांनी क्षेत्रीय वनपरिक्षेत्र अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक व विभागीय केंद्रस्थ अधिकारी यांची वेळोवेळी सभा आयोजीत करुन परिक्षेत्रवार लागणा-या आगीबाबत आढावा घेवून आग लागण्याची कारणे/ चौकशी अहवाल, त्यावर उपाययोजनाची अंमलबजावणी याची दक्षता घ्यावी व आगीवर नियंत्रण करण्यात यावे. वरील विविध कामाची चेक लीस्ट, सोबतच्या प्रपत्रात केलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल, वनवणवा कालावधीकरीता अद्यावत वेळोवेळी तयार ठेवावा. वरिष्ठ वनाधिकारी दौ-यावर असतांना सदर कामाचा आढावा घेतील, तसेच प्रत्येक महिण्यात दोन वेळा होणा-या व्हिडीओ कॉन्फरंस मध्ये सुध्दा आढावा घेतील. त्या वेळेस अद्यावत केलेली कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत संबंधीतास अवगत करावे. सोबत दिलेल्या प्रपत्र-१ व २ मध्ये वनवणवा हंगामात मासिक प्रगती अहवाल १ जानेवारी, २०१९ पासुन नियमित महीना संपताच ५ तारखेपर्यंत या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**सहपत्रः-वरिलप्रमाणे**
**अप्रमुवसं (संरक्षण)म.रा. नागपूर यांचेकडून मान्य मसुदा**

(एस. डब्ल्यू. नाईक)
विभागीय वन अधिकारी (संरक्षण)
प्रमुवसं (वबप्र) म. रा. नागपूर यांचे कार्यालय

15/01/19

D/Jadhav Sir/2018-19/Cr-25

प्रपत्र-१

## वनवणवा संरक्षणासाठी विविध कालावधीत करावयाची कामे बाबत चेक लिस्ट नुसार मासिक प्रगती अहवाल

माहे- ............... २०१९ वनवृत्त.......................

| अ.क्र. | वनविभाग | वनपरिक्षेत्र | विषय | करावयाची कार्यवाहीचा कालावधी | कार्यवाहीसाठी असलेले उद्दिष्ट (संख्या/परिमाण/ क्षेत्र हे./ कि.मी.) | महिना अखेर झालेली कार्यवाही (संख्या/परिमाण/ क्षेत्र हे./ कि.मी.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | संवेदनशिल क्षेत्राचे नकाशे (Fire risk zonation map) वनपरिक्षेत्र स्तरावर वाटप - संख्या | ३१ डिसेंबर | | | |
| २ | | | वन व्यवस्थापन नकाशा (Fire Management map) जाळ रेषा, निरिक्षण मनोरे, रस्ते, जल स्त्रोत, मुख्यालय, फायर फायटिंग युनिट ई. माहीती समाविष्ट असलेले नकाशे वनपरिक्षेत्र स्तरावर वाटप - संख्या | ३१ डिसेंबर | | | |
| ३ | | | फॉरेस्ट सर्वे ऑफ इंडिया च्या संकेत स्थळावर वनाधिकारी/ कर्मचारी यांनी आगीच्या घटना प्राप्त होण्यासाठी नोंदणी करणे (Registration of field Staff for given fire alerts) - संख्या | ३१ डिसेंबर | | | |
| ४ | | | रोपवन क्षेत्रातील गवत कापणे - (क्षेत्र हे.) | सप्टें.- ऑक्टो. | | | |
| ५ | | | जाळरेषा कटाई (Fire line cutting) विविध प्रकारानुसार - (कि.मी.) | ३१ डिसेंबर | | | |
| ६ | | | फायर फायटिंग पथक नियुक्त करणे (Establishment of Fire Fighting unit) - स्थळ व संख्या | १५ फेब्रुवारी | | | |

| अ.क्र. | वनविभाग | वनपरिक्षेत्र | विषय | करावयाची कार्यवाहीचा कालावधी | कार्यवाहीसाठी असलेले उद्दिष्ट (संख्या/परिमाण/ क्षेत्र हे./ कि.मी.) | महिना अखेर झालेली कार्यवाही (संख्या/परिमाण/ क्षेत्र हे./ कि.मी.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ७ | | | जनजागृतीचे करणे (Awareness Campaign) - ग्रामसभा, लोकांचे प्रबोधन, आकाशवाणी/ दुरदर्शन माध्यमाचा वापर, आगीचे दुष्परिणाम बाबत माहिती देणे, लोकांचे सहकार्य, भिंतीपत्रके व पत्रक वाटप - (गाववार संख्या) | ७ फेब्रुवारी | | | |
| ८ | | | प्रशिक्षण (Trainning) क्षेत्रीय कर्मचारी/ अधिकारी, अग्नीरक्षक, गावकरी, वनव्यवस्थापन समिती सदस्य ई.- ( प्रशिक्षणाची संख्या व प्रशिक्षणार्थ्यांची संख्या ) | ३१ जानेवारी | | | |
| ९ | | | सयुक्त वनव्यवस्थापन समिती यांना आग लागु नये याकरीता वाटप केलेले मानधन (JFMC Incentivization) - संख्या | ३१ जानेवारी | | | |
| १० | | | जाळरेषा जाळणे (Fire Burning) विविध प्रकारानुसार- (कि.मी.) | १५ फेब्रुवारी पुर्वी | | | |
| ११ | | | अग्नीरक्षकांची नेमणुक (Fire watcher deployment) - संख्या | १५ फेब्रुवारी पासुन | | | |
| १२ | | | इतर विभागाची मदत प्राप्त झाल्यास विवरण | वनवणवा हंगामात | | | |
| १३ | | | नियंत्रण कक्ष (Control Room) केंद्रस्थ अधिका-याचे नाव व हुद्दा | १५ फेब्रुवारी पुर्वी | | | |

टिप- उपरोक्त प्रपत्रात अहवाल प्रत्येक महिना संपताच ५ तारखेपर्यंत न चुकता सादर करण्यात यावा.

प्रपत्र-२

# वनवणवा संरक्षणासाठी उपलब्ध असलेले साहित्य नुसार मासिक प्रगती अहवाल

माहे- ............... २०१९ वनवृत्त..................

| अ. क्र. | वनविभाग | वनपरिक्षेत्र | आगीवर नियंत्रणाचे साहित्य/ सयंत्र | उपलब्ध असलेले साहित्य संख्या | सन 2018-19 करीता आवश्यक असलेले साहित्य संख्या | सन 2018-19 मध्ये वन हंगामाकरीता खरेदी केलेले साहित्य संख्या | एकुण साहित्य संख्या | साहित्य ठेवल्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | Fire Engine | | | | | |
| 2 | | | Blower | | | | | |
| 3 | | | Fire Beaters | | | | | |
| 4 | | | Fire Rakes | | | | | |
| 5 | | | Fire Proof Uniform | | | | | |
| 6 | | | Forest Fire Shovel | | | | | |
| 7 | | | Water Tanker | | | | | |
| 8 | | | Safety shoes | | | | | |
| 9 | | | Fire Extinguisher | | | | | |
| 10 | | | Pulaski Tool | | | | | |
| 11 | | | Protection Shield | | | | | |
| 12 | | | Protection Strick polycarbonate | | | | | |
| 13 | | | GPS | | | | | |
| 14 | | | Other Equipments | | | | | |
| | | | ***Total*** | | | | | |

टिप- उपरोक्त प्रपत्रात अहवाल प्रत्येक महिना संपताच ५ तारखेपर्यंत न चुकता सादर करण्यात यावा.